मुक्तागिरी
थेट संवाद आपल्याशी...!
सोमवार
दि. 23 ऑगस्ट 2021

# 'संविधानाच्या स्वप्नातलं गाव' – मा

कवी सुभाष वाघमारे यांचा 'संविधानाच्या स्वप्नातलं गाव' हा कवितासंग्रह नुकताच प्रकाशित (५ जून २०२१) झाला. कवी सुभाष वाघमारे मुळचे सोलापूर जिल्ह्यातील मळोली (माळशिरस) गावचे. याच गावात त्यांचे बालपण गेले. बालवयात त्यांच्यावर अनेक संस्कार झाले. तसे त्यांच्या वाटयाला असंख्य दाहक अनुभवही आले. पुढे शिक्षण–नोकरीच्या निमित्ताने, त्यांनी सामाजिक सुधारणेच्या चळवळीत स्वतःला झोकून दिले. फुले, शाहू, आंबेडकर, दाभोळकर आदी समाजसुधारकांच्या विचारांवर त्यांची निष्ठा आहे. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर गावजीवनाचा जितका प्रभाव आहे, तितकाच समाजसुधारकांच्या विचार कार्याचाही आहे.

कवी सुभाष वाघमारे यांची कविता जगण्याचे सारे भोगवटे ताणतणावासह मांडते. आपला अवताल भवताल, आपली सुप्त स्वप्ने, जगण्याची ध्येय उद्दिष्टये, माणसांच्या कल्याणाची सुक्ते ती पहिल्या पानापासून ते शेवटच्या पानापर्यंत ' संवादरूपी शब्दातून' मांडत राहते. म्हणूनच मला ती मानवतेचे गीत गाणारी कविता वाटते.

प्रस्तुत कवितासंग्रहात एकूण १२१ कविता आहेत. कविता आशय, विषय आणि शीर्षकाने अर्थपूर्ण आहेत. त्यांच्या कवितासंग्रहात आत्मपर, सामाजिक, कौटुंबिक, स्त्रीवादी, विवेकवादी, विज्ञानवादी आणि संविधानमूल्यवादी (मानवतावादी) कविता प्रामुख्याने आढळून येतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले 'भारतीय संविधान', २६ जानेवारी १९५० पासून भारतात लागू झाले आणि भारत प्रजासत्ताक देश, लोकशाही प्रधान देश म्हणून ओळखला जाऊ लागला. हे खरं आहे. परंतु, ज्या संविधानाने बलशाली आणि कल्याणकारी भारताचे स्वप्न पाहिले, ते स्वप्न काही अंशाने सत्यात उतरले असले तरी, अजून ते अपूर्णच आहे. कारण अर्धा भारत खेडयात अन् अर्धा शहरात आहे. अजूनही गाव–शहरातून अन्याय अत्याचाराचे, उच्च नीचतेचे, बलात्काराचे, संरजामीवृत्तीचे, गुलामीचे, लाचारीचे, भ्रष्टाचाराचे अन् बेकारीचे सूर बेसूरपणे ऐकू येतात. हीच गोष्ट कवीला खूप छळते, घायाळ करते, अस्वस्थ करते. या अस्वस्थेतूनच कवी सुभाष वाघमारे यांचा प्रस्तुत कवितासंग्रह जन्माला आला आहे.

गावगाडयातली विकृती, सरंजामीवृत्ती संविधानमूल्यांनी मिटवता येईल, पालटता यइल ह्या व्यापक दृष्टिकोनातून त्यांनी कविता लिहिली. संविधानाच्या स्वप्नातलं गाव हे शीर्षकच मोठं अर्थपूर्ण आणि विधायक वाटते. तर काव्यसंग्रहाचे मुखपृष्ठ हे आशावर्धक आणि चिरंतन विश्वास पेरणारे




आहे. विषमतेच्या मुळाशी जाऊन रक्तरंजित होण्यापेक्षा, संविधानाच्या वृक्षछायेत जीवन व्यतित करणे केव्हाही श्रेयस्कर आहे, असा मौलिक संदेश देणारे मुखपृष्ठ कमालीचे बोलके आणि चित्तवेधक आहे.

**होता प्रेमळ निर्मळ पिंपळाचा मळा**
**पाणी आटतच गेले आता लागतात झळा**
( पृ. ४१ )

कवीची प्रेरणास्थाने अनेक आहेत. खुद्द कवीची आई, तिचे जीवन, आजूबाजूच्या आयाबाया, मावशा अन् समाजासाठी आयुष्य समर्पित केलेले सगळे समाजसुधारक कवीच्या प्रेरणास्थानी आणि आदरस्थानी आहेत. गावातल्या जुन्या आठवणी कवीच्यां मनपटलावर टचकन उभ्या राहतात.' पाणी आटतच गेले' ही ओळ गावातल्या विस्कटलेपणाची जाणीव करून देते.

कवी सुभाष वाघमारे यांची कविता जे अयोग्य आहे, अन्यायकारक आहे, मंगल आहे, प्रगतीशील आहे. ते साध्या सोप्या शब्दातून आकारत राहते. म्हणूनच ती सगळ्यांना आपली वाटते. हे 'आपलेपण' त्यांच्या प्रत्येक कवितेतून ठळकपणे उमटत राहते.

**माणसंच सारी, काही आसवांची नाती**
**अंधश्रद्धा जाऊ दे, पेटू दे विज्ञान वाती**
( पृ. ४२ )

भोळसट रूढी परंपरेनेच माणसांचे शोषण अधिक केले, म्हणूनच ह्या भोळसट अंधश्रध्दा मनातून जळून जाऊ दे अन् विज्ञानाच्या वाती घरोघरी पेटू दे. ही विज्ञानाष्ठित दृष्टी देणारी कविता महत्त्वपूर्ण वाटते.

कवी सुभाष वाघमारे यांची कविता संवादरूपी आहे. ती वाचकांना सतत आत्मचिंतन करायला भाग पडते.

**तू उदास असतोस म्हणून**
**दुनिया फायदा घेते**
**म्हणूनच आयुष्य वांझ होते**
**म्हणूनच सुख फिके फिके होते**
**तू आता जागा रहा**
**काम कर काम कर** ( पृ. ११९ )

श्रीपाल सबनीस त्यांच्या कवितेबद्दल म्हणतात, कवी सुभाष वाघमारे यांच्या आत्मपर कविता ह्या मनाला पाझर फोडतात आणि जगण्याचे एक तपस्वी अंगणही समोर आणतात. (पृ. १४, प्रस्तावना) सुभाष वाघमारे यांची कविता आत्मपर असली, तरी त्या कवितांना सामाजिक जीवनाचा गंध आणि स्पर्श आहे.

गावमातीवर आणि संविधानावर कवीचे अलोट प्रेम आहे. गावातल्या सगळ्या आस्था, श्रध्दा कवीच्या आत्मियतेचा विषय असल्या तरी आसवांची नाती जोडणाऱ्या आणि मातीकरणाऱ्या प्रवृत्तीला कवी शह देतो.

**तुझ्या बापजाद्यांचे सांस्कृतिक वर्चस्व**
**आमच्या उरावंर बसवतोस**
**थांब ! त्यासाठीच**

**माझी लेखणी सुरू आहे** ( पृ.१५० )

सरंजामशाहीने, एकाधिकारशाहीने गरिबांचे प्रचंड शोषण केले, काहींचे आयुष्य मातीमोल केले. म्हणून गावागावात तयार झालेले सांस्कृतिक वर्चस्व कवीला हद्दपार करायचे आहे. त्यासाठी कवीची लेखणी सज्ज आहे. कारण कवीला आनंदी गाव हवं आहे.

**पण आता आभाळ होऊन**
**लढतात अनुयायी**
**बनतील ढग पडेल पाऊस**
**भिजेल हळूहळू धरणी**
**उगवतील वाढतील नव्या व्यवस्थेचे कोंब**
(पृ.१४८)

आंबेडकरी विचार आभाळा इतका मोठा आहे. ढगासारखा धावणारा आहे. सगळ्या धरतीला चिंब भिजवणाऱ्या पावसासारखा आहे. आंबेडकरी विचारांचा पाऊस व्यवस्थेला नवे कोंब आणणारा ठरेल, हा कवीचा आशावाद सार्थ वाटतो.

कवी आपल्या कवितेतून कोणत्याही धर्मातल्या थोतांडाची वा निंदेची चर्चा करत नाही. तर धर्म जगणाऱ्या प्रत्येकात प्रज्ञा, शील, करुणा संचारावी अशी आशा बाळगताना दिसतो.

**धर्म असूनही धर्मनिरपेक्ष व्हावे माझे गाव**
**प्रज्ञा शील करुणा यावी, संपावा अन्याय**
( पृ.१८४ )

माणूस माणूस जोडावा अन् मानवताधर्म वाढावा हा कवी
कवितेचा गाभा
गावागावातल्या घरात
व्हावा म्हणून कवी म

**संविधानाच्या र**
**चला चालत ज**

कवी सौंदर्याचा
महाग धुवून जाण्य
पावसाची वाट पा
व्यापक वाटतो. स
पटवून देण्यासाठी क
चपखलपणे करतो.

**पडावा जोरात स**
**अन् गावाचा मळ**
**उमलावी जशी म**
**तशीच घडवीन**
(पृ.१८८)

गावातल्या मुल
आणण्याची कवीची
कवीला कुणाची मा
समाजात माथेफिरूहि
कारण कवी हिंसेचा
पुरस्कार करतो.
रुजवण्यासाठी कव
सातत्याने प्रयत्न कर

कवीच्या जगण्या
विषय झाले आहेत
कवी एके ठिकाणी
उद्याच्या अधिक
विचारते, कधी वेद
उपस्थित करते, कधी
विद्रोह प्रकट करते
करते.( पृ.२४, मनो
सर्वमान्य होणारा
मांगल्यासाठीच अ
तोच तिचा धर्म आ

खेडी वेदनामुक्त
सरंजामी मुक्त व्हाव
गाणे आपल्या कवि

**आंधळ्याने आ**
**डोळसांनी आ**
(पृ.१७३)

मानवतेचे मित्र
शत्रू नावालाही उ
सुंदर वाटतो. कवी
संस्कारसूत्र पेरताना
मर्ढेकर बहिणाबाई
जोडणारी त्यांची
विचार तर कधी ज

**आरं आरं हिटा**
**तुझी मोठी शि**
**माझ्या झोपडी**
**करी जगावर**

**डॉ. आबासाहेब सरवदे**
रयत शिक्षण संस्थेचे वीर वाजेकर महाविद्यालय
फुंडे ता. उरण. जि. रायगड (मराठी विभाग)

# – मानवतेचे गीत गाणारी कविता

वाढावा हा कवी सुभाष वाघमारे यांच्या कवितेचा गाभा आहे. हा गाभारा गावागावातल्या घरात देव्हाऱ्यासारखा स्थापन व्हावा म्हणून कवी म्हणतो,

**संविधानाच्या रस्त्याने**
**चला चालत जाऊया हो (पृ.१८४)**

कवी सौंदर्याचा भोक्ता आहे. गावातील गहाण धुवून जाण्यासाठी कवी समतेच्या पावसाची वाट पाहतो. हा विचारच खूप व्यापक वाटतो. संविधान मूल्यांचे महत्त्व पटवून देण्यासाठी कवी निसर्ग प्रतिमांचा वापर चपखलपणे करतो.

**पडावा जोरात समतेचा पाऊस**
**अन् गावाचा मळ जावाच धुवून**
**उमलावी जशी मोगऱ्याची फुले**
**तशीच घडवीन मी परिर्तनवादी मुले**
**(पृ.१८८)**

गावातल्या मुलामध्ये परिवर्तन घडवून आणण्याची कवीची जिद्द अतुलनीय आहे. कवीला कुणाची माथी फोडायची नाहीत अन् समाजात माथेफेरूही उगवू द्यायचे नाहीत. कारण कवी हिंसेचा निषेध आणि अहिंसेचा पुरस्कार करतो. समाजात विवेकीमूल्य रुजवण्यासाठी कवी आपल्या कवितेतून सातत्याने प्रयत्न करताना दिसतो.

कवीच्या जगण्यातले अनेक संदर्भ कवितेचे विषय झाले आहेत. आपल्या कवितेबद्दल कवी एके ठिकाणी म्हणतो, माझी कविता उद्याच्या अधिक चांगल्या गावासाठी जाब विचारते, कधी वेदना व्यक्त करते,कधी प्रश्न उपस्थित करते, कधी आत्मपरिक्षण करते,कधी विद्रोह प्रकट करते तर कधी हक्कांसाठी संघर्ष करते.( पृ.२४, मनोगत) कवीचा हा दृष्टिकोन सर्वमान्य होणारा आहे. कविता समाजाच्या मांगल्यासाठीच असते अन् असावी. कारण तोच तिचा धर्म आहे.

खेडी वेदनामुक्त, भयमुक्त, विषमतामुक्त, सरंजामी मुक्त व्हावी म्हणून कवी मानवतेचे गाणे आपल्या कवितेतून सतत गातो.

**आंधळ्याने आता उजेडाचे गीत गावे**
**डोळसांनी आता जगण्याचे मीत व्हावे**
**(पृ.१७३)**

मानवतेचे मित्र इतके वाढले पाहिजेत की, शत्रू नावालाही उरू नयेत. हा विचार खूप सुंदर वाटतो. कवी वाघमारे यांची कविता नवे संस्कारसूत्र पेरताना दिसते. कवी केशवसूत, मर्ढेकर बहिणाबाई यांच्या कवितेशी नाळ जोडणारी त्यांची कविता कधी क्रांतिकारक विचार तर कधी जीवनाचे तत्वज्ञान मांडते.

**आरं आरं हिटलरा**
**तुझी मोठी शिरीमंती**
**माझ्या झोपडीचे दार**
**करी जगावर प्रीती ( पृ. ४७ )**

झोपडीतल्या प्रेमापुढे हिटलरची श्रीमंती फिकी आहे. हुकूमशाहीची जाणीव करून देणारी ही कविता. झोपडीतल्या प्रेमाचे सामर्थ्य अधोरेखित करते. श्रीमंतीतून हिटलर जन्माला येतात, तर झोपडीतून प्रेम. ही सूचकता फार महत्त्वाची वाटते.

अलीकडच्या काळात विज्ञाननिष्ठ विचारवंताच्या झालेल्या हत्या, हा सर्वांच्या दृष्टीने चिंतनाचा विषय आहे. ह्या विषयावर भाष्य करणारी त्यांची कविता उदबोधक आहे.

**गोळ्या घालून लपले सारे**
**विचार मरतील आस मोठी**
**उगवून आली नवी पाती**
**सांगा त्यांना आता गोळ्या शिल्लक किती**
**( पृ.७२ )**

विज्ञाननिष्ठ विचार मारण्याचा झालेला प्रयत्न कवीला अयशस्वी वाटतो. गोळ्यांनी माणूस मारता येतो,पण विचार नाही. कारण विचारांना मरण नाही.क्रांतिकारक विचार हे कालातीत आणि वादातीत असतात. दाभोळकर, पानसरे,कलबुर्गी जरी गेले, तरी त्यांच्या विचारांचे हजारो कार्यकर्ते आज तयार झाले. तेव्हा गोळ्या मारणाऱ्यांनो तुमचा विवेक शाबूत ठेवा. असा सावधगिरीचा इशारा देणारी ही कविता मौलिक वाटते.

जातियतेमुळे कवीचे भंगलेले प्रेम कवितेतून व्यक्त होताना दिसते. 'प्रेमर्षी, 'डेस्कवरल्या भावकविता ' यासारख्या कवितेतून ते उत्कटपणे व्यक्त झाले आहे.

**ये माकडा शांत रहा**
**सांड आमची हाय**
**तुझी जात पहा (पृ.६६)**

प्रेम दिव्य असते, उदात्त असते. प्रेमाला जात नसते, धर्म नसतो. पण प्रेम करणाऱ्याला मात्र तो असतो. म्हणूनच कैक प्रेमकहाण्या भंग पावतात. प्रेम जात, धर्म बघून करावे, ही गोष्टच कवीला मान्य नाही. म्हणून प्रेम करणाऱ्या प्रेमवीरांना कवी म्हणतो,

**भुंकणाऱ्या कुत्र्यावर**
**आणि हसणाऱ्या मुलीवर**
**कधीच विश्वास ठेवू नये (पृ.७६)**

भुंकणारी कुत्री चावा घेत नाहीत. तसं केवळ हसणाऱ्या मुली मनापासून प्रेम करत नाहीत, ठाम भूमिका घेत नाहीत. तेव्हा अशा हसणाऱ्या मुलीपासून दूर राहा, असा विश्वासू सल्ला कवी आपल्या कवितेतून देताना दिसतो.

कवी सुभाष वाघमारे यांच्या कवितेतून कामगारांच्या व्यथा, वेदनाही प्रातिनिधिक स्वरूपात प्रत्ययास येतात.

**सायकलची पंक्चर काढायला पैसा नाही**
**मुलाला बिस्कीट घ्यायला पैसा नाही**
**बायकोला लुगडं घ्यायला पैसा नाही**
**दुकानदार माल देत नाही**
**गिरणी बंद, पैसा बंद, पत बंद ( पृ.६२ )**

कामगारांच्या व्यथा, वेदनांची जाणीव करून देणारी ही कविता कामगारांच्या जीवनप्रवासाची कहाणी सांगते. अण्णाभाऊ साठे म्हणायचे, पृथ्वी ही शेषनागाच्या फण्यावर उभी नसून,ती कामगारांच्या तळहातावर उभी आहे. कामगार हा देशाच्या प्रगतीचा कणा आहे. पण आज हा कणाच उदध्वस्त होताना दिसतो आहे. कवी वाघमारे यांची कविता ही शोषितांच्या,वंचिताच्या जीवनजाणिवा अधिक प्रखर करताना दिसते.

कवी अवताल-भवतालच्या दुःखाने उदास किंवा निराश होत नाही. कारण कवीची प्रज्ञा त्याला कायम सतेज आणि आशावादी ठेवते. कवीला धर्मयुद्धाने किंवा जातियुध्दाने पृथ्वी रिकामी करायची नाही, तर सदाचाराने, लोकशाहीमूल्यांनी ती सुंदर करायची आहे.

**अश्रू आनंदाचे सारे**
**माझ्या डोळ्यामध्ये येवो**
**संविधानासारखा आता**
**माझा गाव होवो ( पृ.१८४ )**

गावाच्या कल्याणाचं पसायदान मागणारी ही कविता क्रांतिकारक ठरावी अशी आहे.

कवी सुभाष वाघमारे यांच्या प्रस्तुत कवितासंग्रहात काही दीर्घ कविता आहेत. एकच विषय अनेक कवितातून डोकावत असला तरी तो कवीचा दोष नसून कवीची अपरिहार्यता आहे. काही किरकोळ दुर्बोध शब्द सोडले तर (उदा. क्रुध्दकंटकी, रडचंडिणी, स्नेहार्द्र, धुल्ला, तनुचे) कविता रोजच्या भाषेतून व्यक्त होताना दिसते.ती कुठल्याही व्रताच्या, छंदाच्या चौकटीत अडकत नाही. त्यापासून ती दूर राहते. वर्तमान गाव, समाज, देश आणि व्यवस्था शब्दबद्ध करताना कवितेत आलेला उपरोध, उपहास हा विखाराच्या दिशेने नव्हे ; तर गुणवत्तेचे दिशेने वाटचाल करताना दिसतो. त्यांच्या कवितेला कल्पनेचे नव्हे तर वास्तवाचे पंख आहेत.व्यवस्थेला प्रश्न विचारणारी ही कविता, व्यवस्थेतल्या विषमतेवर हासूड ओढते. व्यवस्थेत समता नांदावी म्हणून ती व्यवस्थेलाच शहाणी करते. राष्ट्रीय एकात्मतेचा बंध गुंफणारी ही कविता मानवतेचे गीत गाणारी कविताच वाटते. सगळ्यांना सोबत घेऊन, सगळ्यांचं भलं चिंतणाऱ्या कवीला पुढील वाटचालीस शुभेच्छा..

**- कवितासंग्रह -**

**संविधानाच्या स्वप्नातलं गाव**

**कवी - डॉ. सुभाष वाघमारे**

प्रकाशन वर्ष - २०२१ प्रथमावृत्ती
प्रकाशन संस्था - साहित्यविश्व प्रकाशन पुणे
मूल्य = २५०, पृष्ठे - १८४